**MHSO130000061978**

# निशाणी क्र. ६८३ वरील आदेश

वादी ने सदरचा अर्ज अबेटमेंट सेट असाईड व वारस रेकॉर्डवर घेण्याकरिता दिला आहे. त्यामध्ये त्यांचे असे कथन आहे की, सदरचा दावा दाखल झाल्यानंतर दाव्याचे कामकाज चालू असताना प्रतिवादी नं.८क राजेंद्र पर्वत माने हे दिनांक १८/०७/२०१५ रोजी बार्शी येथे व प्रतिवादी नं.८इ गजानन पर्वत माने हे दिनांक ०१/०६/२०१९ रोजी बार्शी येथे मयत झाले आहेत. त्यामुळे मयत प्रतिवादींचे वारस रेकॉर्डवर घेवून दाव्याचे काम पुढे चालणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. वादीस सदर प्रतिवादी मयत झालेची माहिती सदर दाव्यात पुरसीस दिल्यानंतर झाली त्यामुळे मुदतीत दुरुस्ती करता आली नाही. त्यामुळे त्यांना सदरचे वारस रेकॉर्डवर घेण्यास उशीर झालेला आहे. वादीने जाणुनबजुन उशीर केलेला नाही. त्यामुळे दाव्यात तांत्रीक उणीव राहू नये म्हणून झालेला उशीर माफ होऊन व दाव्याचा गुणदोषांवर निकाल होणेसाठी अबेटमेंट सेट असाईड करुन मयतांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

२. अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीस ऐकले. वादीने सदरचा दावा हा सरस निरस मानाने वाटप होउन मिळणेकरिता व पृथक कब्जा मिळणेकरिता दाखल केला आहे. वादीने सदर प्रतिवादी नं.८क व प्रतिवादी नं.८इ यांचा मृत्यु झाला असल्याबाबत त्यांचे मृत्युचे दाखले निशाणी क्र.६८२ च्या यादीसोबत जोडलेले आहेत. त्यांची पाहणी केली असता त्यावर प्रतिवादी नं.८क राजेंद्र पर्वत माने हे दिनांक १८/०७/२०१५ रोजी बार्शी येथे व प्रतिवादी नं.८इ गजानन पर्वत माने हे दिनांक ०१/०६/२०१९ रोजी बार्शी येथे मयत झाले असल्याचे दिसून येते. वादीने सदर मयत प्रतिवादी क्र.८क व प्रतिवादी क्र.८इ यांचे वारस मयत झालेपासुन ९० दिवसांत रेकॉर्डवर घेणे आवश्यक होते परंतु, त्यांनी सदर प्रतिवादी क्र.८क यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास सुमारे ८ वर्षांपेक्षा जास्त तर प्रतिवादी क्र.८इ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास सुमारे ४ वर्षांपेक्षा जास्त विलंब केला असल्याचे दिसून येते. सदरचा दावा प्रतिवादी क्र.८क व प्रतिवादी क्र.८इ यांचे विरुध्द अबेट झालेला आहे.

३.    जरी असे असले तरी, सदरचा दावा हा सन १९७८ साली दाखल झालेला असून वादी व प्रतिवादी यांचे हक्क हितसंबंध सदर दाव्यामध्ये गुंतलेले आहेत. त्यामुळे वादीचा सदरचा निशाणी  क्र. ६८३ चा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, वादीचा अर्ज निशाणी क्र.६८३ रु.३००/- रुपयांच्या खर्चासह मंजूर करण्यात येतो व त्यांना मयत प्रतिवादी क्र.८क व प्रतिवादी क्र.८इ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास परवानगी देण्यात येत आहे.

Digitally signed by Santosh Bholaram Vijaykar
Date: 2023.10.19 17:25:18 +0530

बार्शी    (एस.बी. विजयकर)
दिनांक १९/१०/२०२३.    सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बार्शी.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | S.R. Barangule |
| (b) | Court | : | S.B. Vijaykar, Jt.C.J.J.D.&J.M.F.C. Barshi. |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 19/10/2023 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 19/10/2023 |